Open Access

उदयगिरी - बहुभाषिक इतिहास संशोधन पत्रिका

(A Bimonthly, Refereed, & Peer Reviewed Journal of History)
Published by: AAASSHER, Mumbai, (MS) India
Journal homepage: https://udayagiri.aaassher.org/
ISSN (Online): 2583-8423
Volume 1, Issue 4, October 2023; Pages 759 – 762
DOI: 10.5281/zenodo.10279614

Original Research Article

# महात्मा गांधीजींची ग्राम विकासाची संकल्पना – एक दृष्टीक्षेप

प्रा. डॉ. संतोष सुधाकरराव कोटुरवार

विभाग प्रमुख, इतिहास विभाग, नेताजी सुभाषचंद्र बोस महाविद्यालय, नांदेड ४३१६०४ महाराष्ट्र, भारत

*Corresponding author E-mail*: sskotur1976@gamil.com

Received: 13 October, 2023 | Accepted: 26 October, 2023 | Published: 28 October, 2023

भारतीय स्वातंत्र्य चळवळीत म.गांधीजींचे स्थान अत्यंत महत्त्वाचे आहे. जवळपास तीन दशके भारतीय स्वातंत्र्य चळवळीचे नेतृत्त्व गांधीजींनी केले. 1920-1947 हा कालखंड इतिहासात गांधी युग म्हणून ओळखला जातो. या कालावधीत स्वातंत्र्य लढा त्यांच्या नेतृत्त्वाभोवती केंद्रित झाला होता. त्यांच्या विचार व तत्त्वाचा प्रभाव जनमानसावर पडून स्वातंत्र्य चळवळीची व्याप्ती देशाच्या कानाकोपऱ्यात विस्तारित झाली होती. आज स्वातंत्र्यानंतर ही त्यांच्या विचार व तत्त्वाचा प्रभाव भारतासह परराष्ट्रात मोठ्या प्रमाणात विस्तारला आहे. विशेषत: सत्य, अहिंसा, सत्याग्रह, सर्वोदय व ग्राम स्वराज्य ही तत्व गांधीजींच्या विचार व कार्याचा मुलाधार आहेत.

प्रस्तूत लघूशोध निबंधात महात्मा गांधीजींची ग्राम विकासाची संकल्पना – एक दृष्टीक्षेप या शिर्षकाखाली गांधीजींच्या विचारातून ग्राम विकासाची संकल्पना अभ्यासण्याचा प्रयत्न करण्यात आला. महात्मा गांधीजींनी भविष्यातील भारत घडविण्याची क्षमता ग्रामीण भागात (खेड्यात) आहे. या विचारातून ग्राम स्वराज्य अथवा राम राज्याची संकल्पना मांडली आहे. विज्ञान व तंत्रज्ञानाचा अफाट प्रसार झालेल्या 21 व्या शतकात देखील गांधीजींनी ग्रामीण विकासासाठी मांडलेल्या संकल्पना उपयुक्त आहेत. ग्रामस्वराज्य व श्रमप्रतिष्ठा या मार्गातून ग्रामीण भारतीय जीवनाचा विकास शक्य असल्याचे गांधीजींचे मत आहे.

### विषयाची निवड व महत्व

स्वातंत्र्याची 75 वर्षे पूर्ण होऊन देखील आज भारतातील बहूतांश लोकसंख्या खेड्यात राहते. तसेच भारतीय समाज जीवन व अर्थव्यवस्थेचा मुलाधार ग्रामीण भारत आहे. ही वस्तूस्थिती असताना देखील समाज व शासन या दोन्ही घटकांचे ग्रामीण भारतीयांकडे दुर्लक्ष होत आहे. परिणामी शहराचा अनावश्यक अफाट विस्तार होत आहे. ही परिस्थिती

अनेक समस्या उद्भवण्यास कारणीभूत आहे. म्हणून शहराबरोबरच ग्रामीण भागात सोयी-सुविधा उपलब्ध करुन द्यावेत यासाठी समाज व शासन या घटकांना जागरूक करण्यासाठी प्रस्तूत विषयाची निवड केली आहे.

**शोध निबंधाची उद्दिष्ट्ये**

१. म.गांधीजींनी ग्रामीण विकासासाठी मांडलेल्या संकल्पना अभ्यासणे.

२. म.गांधीजीच्या ग्रामविकास विषयक विचारांची उपयुक्तता वर्तमान भारतीयांसमोर मांडणे.

३. खेडी स्वंयपूर्ण झाली पाहिजे हा गांधीविचार समाजासमोर मांडने.

४. ग्राम स्वराज्य, रामराज्य, श्रमप्रतिष्ठा, सर्वोदय इ. तत्वाचा अभ्यास करणे.

**संशोधन पद्धती**

प्रस्तूत शोध निबंधासाठी विश्लेषणात्मक व वर्णनात्मक संशोधन पद्धतीचा उपयोग केला आहे. तसेच सदरील विषयांच्या संदर्भातील तथ्य संकलनासाठी दुय्यम स्त्रोतांचा –यामध्ये संदर्भग्रंथ, प्रकाशित साहित्य, मासिके इ. चा उपयोग केला आहे.

म.गांधीजींनी भारतीय स्वातंत्र्य चळवळीमध्ये केलेले कार्य अत्यंत उल्लेखनिय-परिणामकारक व स्वातंत्र्य चळवळीला एक निश्चित दिशा देणारे आहे. त्याप्रमाणेच स्वातंत्र्योत्तर भारतीय समाजजीवनाची जडण-घडण करण्यासाठी त्यांनी दाखविलेल्या मार्गाची उपयोगिता परिणामकारक आहे. ग्रामविकास विषयक त्यांचे विचार भारतीयांना एक निश्चित दिशा देणारे आहेत. 21 व्या शतकात देखिल समतोल व शाश्वत ग्रामविकासासाठी गांधी विचारांची उपयोगिता आहे. त्यांनी मांडलेला ग्रामीण विकासाच्या विचारापैकी ग्रामस्वराज्य व श्रम प्रतिष्ठेचे महत्व हे भारतीय अर्थव्यवेस्थेच्या विकास दृष्टीने महत्वपूर्ण आहे. खेड्यांनी शहरावर अवंलवून राहने. हे महात्मा गांधींना कधीच मान्य नव्हते. प्रत्येक खेडी गावे आर्थिक दृष्ट्या स्वंयपूर्ण असावी व खेडी गावांना सार्वभौमत्व असने हे गांधीजींच्या ग्राम स्वराज्य संकल्पनेवरुन स्पष्ट होते. याबरोबरच भारतीय खेड्यातील जीवनपद्धती, उत्पादनाची साधने, राहणी मानातील साधेपणा, परस्पर संबंध सण-संस्कृती या बद्दल म.गांधीजींना, आदर, आकर्षण व प्रेम होते. त्यांनी 27 फेब्रु 1937 रोजी 'भारताचा गाभा जर तुम्हाला पहायचा असेल तर मोठ्या शहराकडे दुर्लक्ष करा, तुम्ही खेड्यात जा' असा उपदेश करुन ते स्वत: खेड्यात राहू लागले व ग्रामजीवनातील त्रुटी, शिक्षणाचा अभाव, रोजगाराची समस्या, आरोग्य विषयक मर्यादा, विकासविषयक विसंगती या परिस्थितीचा बारकाईने अभ्यास करुन म.गांधीजींनी ग्राम विकासाची संकल्पना पूढील प्रमाणे मांडली.

म.गांधीजींनी ग्रामविकासाची संकल्पना मांडत असताना गावाची पुर्नरचना, गावाचे आरोग्य, उपचार पद्धती, शेती, पशूपालन, जमिनीचा प्रश्न, खादी व ग्रामउद्योग गावाचे स्वावलंबन आणि सहकार, ग्रामीण शिक्षण, ग्रामसंरक्षण, ग्रामस्वराज्य, नागरिकांचा आहार इ. घटकांच्या परिपूर्ण विकासातूनच ग्रामीण भारतीय समाज जीवनाचा विकास निश्चित असल्याची जाणीव करुन दिली.

ग्रामीण विकासासाठी ग्रामस्वराज्य हा सर्वोत्तम मार्ग आहे. तसेच खादीचा प्रसार व वापर ग्रामीण जीवनात आर्थिक स्वावलंबनासाठी अत्यावश्यक असल्याचे प्रतिपालन केले या बरोबर सर्वोदय स्वदेशी, श्र्मप्रतिष्ठा इ. घटकांच्या

माध्यमातून ग्रामविकास शक्य असल्याची जाणीव करुन दिली व भारतात विकासाचा केंद्रबिंदू ग्राम असावा ग्रामीण भागाचा किंवा खेड्यांचा विकास झाल्याशिवाय भारतात खऱ्या अर्थाने आर्थिक आणि औद्योगिक विकास होणार नाही. असे मौलिक विचार मांडले.

म.गांधीजींच्या ग्रामीण लोकोद्धाराच्या कार्यक्रमातील महत्त्वाचा घटक म्हणजे म्हणजे अस्पृश्यता निर्मुलन करणे हे होते. यासाठी हरिजन सेवा संघाची स्थापना केली. या माध्यमातून प्रयत्न केले. अस्पृश्यता निर्मुलन बरोबरच ग्रामोद्योग, गोरक्षण, मुललूत शिक्षण, खादीप्रसार या प्रकारच्या अनेक प्रयत्नातून व प्रकल्पातून गरिब, शोषित जनतेची, खेड्यातील लोकांची अर्थिक व सामाजिक उन्नती करण्याचा प्रयत्न म.गांधीजींनी केला आहे.

सांराश रुपाने गरजांच्या बाबतीत स्वयंपूर्ण, आरोग्यपूर्ण, स्वच्छ, सुंदर, श्रम कमी करणाऱ्या यंत्राचा स्वीकार करणारी सुसंस्कृत गावे हे महात्मा गांधीजींचे ध्येय होते. त्यासाठी परस्पर सहकार्याच्या माध्यमातून ध्येय पूर्ण करण्यावर त्यांचा भर होता. हे करतांना गावाचे प्रशासन गावाच्या हाती असावे असे. आग्रहाने प्रतिसादले.

**संदर्भ सूची**


१. डॉ.ग्रोवर बी. एल., डॉ.बेल्हेकर एन. के. (अनु.), आधुनिक भारताचा इतिहास, एस. चंद आणि कंपनी, नवी दिल्ली.

२. सुरेश द्वादशीवार, गांधीजी आणि त्यांचे टीकाकार, साधना प्रकाशन, पुणे, 2018.

३. डॉ. सुमन वैद्य / डॉ.शांता कोठेकर, आधुनिक भारताचा इतिहास, श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर, फेब्रुवारी, 2015.

४. डॉ.श्रीनिवास सातभाई, आधुनिक भारताचा इतिहास, विद्या बुक्स पब्लिशर्स, औरंगाबाद, जानेवारी, 2014.

५. समाधान महाजन, आधुनिक भारताचा इतिहास, द युनिक ॲकडमी, पुणे, 2014.

६. डॉ. रमेश रामराव बैनवाड (पाटील), समकालीन भारतीय राजकारण : महात्मा गांधी, आदित्य पब्लिकेशन्स, नांदेड.

७. Dr.S.G. Talnikar / Dr. P. B. Pahl, Relevance of Gandhian Thoughts at Present Era, Academic Book Publication, Jalgaon, 2017.

८. सिताराम पुरुषोत्तम पटवर्धन (अनुवादीत), सत्याचे प्रयोग अथवा आत्मकथा, नवजीवन प्रकाशन मंदीर, अहमदाबाद, फेब्रुवारी, 1997.

९. गांधी विचार (OPN-74), यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक.

१०. रामचंद्र गुहा, साजिक इनामदार (अनु.), गांधी विरोधकांचा पंथ निर्माण करताना, साधना प्रकाशन, 2019.

११. डॉ. एस. एस. गाठाळ, आधुनिक भारताचा इतिहास, कैलास पब्लिकेशन, औरंगाबाद, जुलै, 2019.

१२. महात्मा गांधी, माझ्या स्वप्नातील भारत, परमधाम प्रकाशन, वर्धा.